# उल्हासनगर महानगरपालिका
## माहिती व जनसंपर्क विभाग

(१५) D.T. 25/7/24 5:30

दिनांक : २५/०७/२०२४

# प्रेसनोट

दोन दिवसापासून पावसाचे प्रमाण वाढल्यामुळे नदी नाल्यांच्या पाणी पातळीत वाढ झालेली आहे. त्यामुळे दि. २४/०७/२४ व २५/०७/२४ या दोन दिवशी मा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अझीझ शेख यांनी हिराघाट व विठ्ठलवाडी, खन्ना कंपाऊंड, मद्रासी पाडा व उल्हास स्टेशन परिसर इ.ठिकाणी पाहणी केली. पाहणी करतांना सदर नाल्याच्या पाणी पातळीत वाढ झाल्याचे दिसून आले म्हणुन मा.आयुक्त यांनी नदीकिनारी राहणाऱ्या लोकांना धोक्याची पातळी ओलांडण्या अगोदर ताबडतोब सुरक्षित स्थळी महापालिकेने नियोजित केलेल्या समाज मंदिर/ महापालिका शाळा /बुध्दविहार याठिकाणी स्थलांतरीत करण्यात यावे असे उप-आयुक्त डॉ.सुभाष जाधव,मनिष हिवरे व आपत्कालीन व्यवस्थापक श्री. यशवंत सगळे यांना निर्देश दिले.

यावेळी उपायुक्त डॉ.सुभाष जाधव,जनसंपर्क अधिकारी छाया डांगळे, सहा.आयुक्त मनिष हिवरे, भांडार विभाग प्रमुख अंकुश कदम, स्वछता निरीक्षक एकनाथ पवार व इतर कर्मचारी उपस्थित होते.

तसेच मा. प्रशासक तथा आयुक्त यांच्या निर्देशानुसार उपायुक्त सुभाष जाधव व भांडार विभाग प्रमुख अंकुश कदम यांनी करोतिया नगर येथील पाहणी केली असता, सदर ठिकाणी नागरिकांच्या घरात पाणी शिरल्याचे दिसले. त्यामुळे तेथील जवळजवळ ५०० ते ५५० नागरिकांना पंचशील बुध्दविहार येथे स्थलांतरीत करण्यात येवून त्यांना चहा, पाणी, नास्टा, व जेवणाची सोय करण्यात आली. व बॅरेक नं. ३९० समोर, पोस्ट ऑफीस रोड याठिकाणी नाल्यात पडलेली धोकादायक भिंत संबंधित अधिकाऱ्यांनी पाहणी करुन सदर मलबा हटविण्यात आला.

क्रांती नगर रेल्वे लाईनच्या बाजूला उल्हासनगर-३ येथे झाड पडल्याने तेथील झाडाचा कचरा व झाडाच्या फांदया उचलण्याचे काम अग्निशमन विभागाद्वारे करण्यात आले.तसेच ए ब्लॉक रोड, प्लायवूड कंपनी येथील नाल्यात भिंत पडल्याने मलबा हटवण्यात येवून सदर नाला वाहता करण्यात आला.

पावसामुळे शहरात कसलीही जिवित व वित्तहानी होऊ नये यासाठी महापालिका प्रशासन यंत्रणा नागरिकांच्या सेवेत सतर्क आहे.

25/7/24

(छाया प्रकाश डांगळे)
जनसंपर्क अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत – माहितीस्तव.
मा. प्रशासक तथा आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका

प्रत – योग्य त्या कार्यवाहिस्तव रवाना.

१) पत्रकार कक्ष, उल्हासनगर महानगरपालिका
२) सिस्टीम ॲनलिस्ट, माहिती तंत्रज्ञान विभाग, उल्हासनगर महानगरपालिका
   - सदरची प्रेस नोट उल्हासनगर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.